लोकमत

# १० हजार ७६६ नागरिकांना मिळणार 'वयोश्री'चा लाभ

## ज्येष्ठ नागरिकांना मिळणार मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

चंद्रपूर : राज्य शासनाने ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना मदतीचा हात म्हणून 'मुख्यमंत्री वयोश्री' योजना सुरू केली. या योजनेच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर शासनाकडून एकवेळ एकरकमी तीन हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यात या योजनेंतर्गत आतापर्यंत १० हजार ७६६ नागरिकांनी अर्ज केले आहेत. जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी 'मुख्यमंत्री वयोश्री' योजनेसाठी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासन व समाजकल्याण विभागाने केले आहे.

'मुख्यमंत्री वयोश्री' योजनेचे नागपूर विभागात एकूण ६६ हजार ८९८ अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी चंद्रपूर जिल्ह्यात प्राप्त अर्जांची संख्या १० हजार ७६६ आहे. ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, यावर उपाययोजना करण्यासाठी एकरकमी तीन हजार रुपये लाभार्थ्यांच्या बचत खात्यात जमा केले जाणार आहे.



### ही उपकरणे खरेदी करता येणार

मुख्यमंत्री वयोश्री योजनेंतर्गत पात्र ज्येष्ठ लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थता, दुर्बलतेनुसार चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हिलचेअर, फोल्डींग वॉकर, कमोड खुर्ची, नी-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्व्हाइकल कॉलर खरेदी करता येतील. राज्य शासनाद्वारे नोंदणी करण्यात आलेल्या योग उपचार केंद्र, मनःस्वास्थ केंद्र, मनःशक्ती केंद्र, प्रशिक्षण केंद्र येथे त्यांना सहभागी होता येणार आहे.